| MHST080003692016 | रे. दि. मु. क्रमांक ७१/२०१६ मधील नि. क्र. ३९<br>खालील आदेश.<br>बाजीराव शेडगे विरुध्द रोहिदास शेडगे |
|---|---|

**(आदेश पारित दिनांक ०९.०९.२०२४)**

---

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी मौजे शेखमिरवाडी, ता. खंडाळा, जि. सातारा येथील गट नंबर ४९८, नं. ४४१, नं. ७०८, नं. ४१३ व १ या शेतजमिन मिळकती दाव्यात सामील करणेचे अनुषंगाने योग्य ते सर्व हुकूम व्हावेत, याकरिता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तूत अर्जात प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व इतर कारणासाठी केलेले आहे. परंतु दाव्यामध्ये शेखमिरवाडी येथील सर्व समाईक गट नंबर म्हणजेच गट नंबर ४९८, नं. ४४१, नं. ७०८, नं. ४१३ व १ हे सामील केलेले नाहीत व त्याचेही वाटप झालेले नाही. याकामी प्रतिवादीनेही Counter Claim केलेला आहे. परंतु जोपर्यंत वादी दाव्यात वरील गट नंबर दावा मिळकती म्हणून सामील करीत नाहीत तोपर्यंत प्रतिवादीनाही Counter claim मध्ये दावा मिळकती म्हणून वरील शेतजमिनीचे गट नंबर सामील करता येत नाहीत. वादीला इतर गटाचे वाटप झालेले नसताना त्या सामील न करता Partial Partition कायद्याने मागता येणार नाही व वादीने वाटपाचा दावा केलेला असल्याने सर्व मिळकती दाव्यात सामील करुन गुणावगुणावर निकाल याच दाव्यात येणेसाठी सदरच्या मिळकती कायद्याने व Multiplicity of Proceeding यासाठी वर पॅरा नं. १ मध्ये नमूद मिळकती या दाव्याचे कामी सामील करणे गरजेचे आहे व कायद्याने आवश्यक आहे. तसे न केल्यास या प्रतिवादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, मौजे शेखमिरवाडी, ता. खंडाळा, जि. सातारा येथील गट नंबर ४९८, नं. ४४१, नं. ७०८, नं. ४१३ व १ या शेतजमिन मिळकती दाव्यात सामील करणेचे अनुषंगाने योग्य ते सर्व हुकूम व्हावेत अशी विनंती केलेली आहे.

०३. प्रस्तूत अर्जावर वादी यांनी असे म्हणणे दाखल की, प्रतिवादीचे अर्जातील मागणी वादीस मान्य नाही. वादीनी या अर्जात दिलेल्या जमीनी या अनेक सहहिस्सेदार याचे नावासह आहेत. त्या मधील वादी व प्रतिवादीचा हिस्सा वेगळा करता येत नाही व त्याचे कारण ही वादी प्रतिवादीचा त्या समाईक जमिनीमधील हिस्सा सर्वांना मान्य आहे व त्याची वहिवाट समाईकात करावयची आहे. त्यातील हिस्सेवारी बद्दल काहीही कोणाची मागणी नाही. केवळ त्या ७/१२ वर मोठया प्रमाणात सहहिस्सेदार आहेत त्यांना समील करुन दाव्याचे कामकाज लांबविण्याचे उद्देशाने मागणी केली आहे. अर्ज फेटाळण्यात यावा, या स्वरुपात अर्ज आणू शकत नाही.

०४. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने सदर दाव्यात अ. दाव्यातील गट नंबर १९० या जमिनीसह घर मिळकतीसह दाव्यातील सर्व मिळकती वादी, प्रतिवादींच्या वडिलार्जित असून त्याचे वाटप मागण्याचा वादींना कायदेशीर हक्क आहे असे जाहीर होवून मिळावे, ब. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा १/७ वा हिस्सा ठरवून बाकीचे सर्व हिश्श्यांचे वादींना सरसनिरस मानाने वाटप होवून सर्वांचे हिस्से ठरवून स्वतंत्र कब्जे अगर Partition Act प्रमाणे वाटप देण्याचा आदेश व्हावा, क. दावा जमिनीतील १अ/१ब मधील जमिनींचे वाटप कलेक्टर सो., सातारा यांचेकडे वाटपाचे काम पाठवून त्याप्रमाणे कब्जे देण्याचा आदेश व्हावा, ड. या दाव्यातील घर मिळकतीचे १ (क) चे वाटप कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करुन त्यांचे मार्फत वाटपाचा आदेश व्हावा, इ. या दाव्याचा ईन्साफी खर्च वादीस प्रतिवादीकडून देववावा, ई. वादीस जरुर तर योग्य तर दावा दुरुस्ती परवानगी असावी, अशी विनंती केलेली आहे.

०५. प्रतिवादीनुसार, वादींनी उपरोक्त नमूद मिळकती या दाव्यात सामील केल्या नसल्यामुळे त्यांना प्रतिदाव्यामध्येही त्या मिळकती सामील करता येत नाहीत. परंतु, सदरचा दावा हा वादीचा आहे. वादीने नमूद केलेल्या मिळकतीबाबत व दाव्यात केलेल्या प्रार्थनाबाबत दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल. केवळ प्रतिवादींच्या कथनानुसार, उपरोक्त मिळकती या दाव्यात सामील करणे आताच न्यायोचित होणार नाही. वाटपासंदर्भात वादी आपला उपरोक्त नमूद मिळकतीवरील हक्क सोडून दावा मिळकतीबाबतच फक्त दाद मागत आहे. याचाच अर्थ वादीने आपला उपरोक्त नमूद

मिळकतीमधील हक्क सोडल्याचे प्रथमदर्शनी लक्षात येते. वादीनुसार, "वादी व प्रतिवादींचा सामाईक जमिनीमधील हिस्सा सर्वांनाच मान्य आहे व त्याची वहिवाट समाईकात करावयाची आहे. त्यातील हितसंबंधाबाबत काहीही कोणाची मागणी नाही." सदर कथन पाहता देखील वादीची त्या मिळकतीबाबत मागणी नाही व वादी स्वतःच त्या मिळकतींना दाव्यात सामील करुन न घेता त्या मिळकतीबाबत दाद मागत नाही किंवा वादीला त्या मिळकतीबाबत दाद मागण्याची आता गरज नाही असे दिसते. दावा व दाव्यातील प्रार्थना पाहता, नमूद मिळकती या दाव्यात समाविष्ट न केल्यास दाव्याचा निकाल गुणवत्तेवर देण्यास काहीही अडचण होणार नाही. सबब, खालीप्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज नामंजूर करणेत येतो. |
| २. | खर्चाबाबत काही आदेश नाही. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

PATTEBAHADUR KARUNA
Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.09.13 15:54:35 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)
दिनांकः- ०९.०९.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा

लघुलेखकाचे नाव – सौ. सुवर्णा संकेत शिंदे

Sd/-
( एस.एस.शिंदे)
लघुलेखक